E-5292565

जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ /२०२५
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 07/05/2025.

## दक्षता विभागाचे परिपत्रक -१९

विषय- कार्यालयीन कामकाजाकरीता विकत घेण्यात येणा-या सामुग्रीचा योग्य अभिलेख ठेवण्याबाबत.

म्हाडामध्ये दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असलेली विविध सामुग्री विविध विभागांमार्फत निविदा प्रक्रिया राबवून खरेदी केली जाते. सदर सामुग्री प्राप्त झाल्यानंतर म्हाडाने केलेल्या मागणीनुसार व निविदेत नमूद विनिर्देशानुसार सामुग्री आहे किंवा कसे, याची पडताळणी होणे आवश्यक असते.

या कार्यालयास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने असे आढळून आले की, काही प्रकरणांमध्ये सामुग्री म्हाडास प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयाने आलेल्या सामुग्रीची नोंद अभिलेखावर ठेवलेली नाही. सदर बाब अनुचित असून यामध्ये गैरव्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आदेशित केलेली सामुग्री प्राप्त झाल्यानंतर प्रत्येक विभागाने प्राप्त सामुग्रीची संख्या, विनिर्देश व गुणवत्ता तपासणेसाठी एक समिती स्थापन करावी. सदर समितीने प्राप्त सामुग्रीची संख्या, विनिर्देश व गुणवत्ता तपासावी व कार्यादेशामध्ये उल्लेखित तपशीलाशी तुलना करावी. या दोन बाबींमध्ये तफावत नसेल तरच सामुग्री स्विकारावी.

स्विकारलेल्या सामुग्रीची संबंधित कार्यालयाच्या इन्व्हेंन्टरी अभिलेखात नोंद करावी. सदर प्रक्रियेनंतरच सामुग्री पुरवठ्याचे देय अदा करण्यात यावे.

सदर आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी, प्राधिकरण.

प्रत: उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.